# नागपूर-नागभीड मार्गासाठी जमीन अधिग्रहित ?

## निविदा मागविल्या

## कामाला गती मिळणार

◆ **नागपूर, १० नोव्हेंबर**

बहुप्रतीक्षित नागपूर-नागभीड या नॅरोगेज रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये परिवर्तन करण्यासाठी जमीन अधिग्रहिणाच्या कामाला गती मिळाली आहे. यासाठी नोटीसही बजावण्यात आली आहे. निविदाही मागविल्या आहेत. युद्धपातळीवर काम सुरू झाल्याने लवकरच हा मार्ग ब्रॉडगेजमध्ये रूपांतरित झालेला असेल.

भारतीय रेल्वेत नॅरोगेज बंद करून त्याऐवजी ब्रॉडगेज मार्ग टाकण्यात येत आहे. नागपूर विभागाचा विचार केल्यास येथील नॅरोगेज मार्ग पूर्णत: बंद करण्यात आले. आता केवळ नागपूर-नागभीड हा एकमेव मार्ग शिल्लक आहे. या मार्गावरही ब्रॉडगेजचा मार्ग सुकर



झाला आहे. तत्कालीन रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांनी १०६ किमी लांबीच्या या नॅरोगेज मार्गास ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्याची मंजुरी दिली होती. परंतु तांत्रिक कारणामुळे काम रखडले जात होते. खासदार अशोक नेते यांनी नागभीडच्या प्रश्नावर रेल्वेच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेऊन या मार्गातील अडचणी दूर करण्याचे निर्देश दिले होते. या प्रकल्पाला ७०८ कोटी ११ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. यासाठी केंद्र आणि राज्य सरकार ५० -५० टक्के वाटा उचलत आहे. दोघांनीही आपल्या वाट्याची रक्कम दिली आहे. या मार्गाचे तीन टप्प्यांत काम होणार असून, पहिल्या टप्प्यात नागभीड-भिवापूर, दुसऱ्या टप्प्यात भिवापूर-उमरेड आणि तिसऱ्या टप्प्यात उमरेड-नागपूर असे काम विद्युतीकरणासह होणार असल्याची माहिती आहे.

मध्य रेल्वे नागपूर विभागातील नॅरोगेज मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर झाले आहे. केवळ नागभीड-नागपूर हाच एकमेव मार्ग शिल्लक होता. १०६ किमी. लांबीच्या या रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर झाल्यास चंद्रपूर जिल्ह्यातील मूल, सिंदेवाही, नागभीड, ब्रह्मपुरी, गडचिरोली जिल्ह्यातील वडसा, कुरखेडा, आरमोरी, गडचिरोली व भंडारा जिल्ह्यातील पवनी, लाखांदूर या तालुक्यांना नागपूरसाठी सोयीचा मार्ग ठरणार आहे.

◂ *(तभा वृत्तसेवा)*